ePaper

**सुप्रिया सुळेंकडून 100 एकर जमीन हडपण्याचा प्रयत्न, लक्ष्मण हाकेंच्या आरोपाने खळबळ!**

वर्ष - 9 । अंक -79 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज ™

## आतील पानांत


- ही निर्लज्ज माणसं तुमच्या विजयाचा वापर
- तो एखाद वेळेस मार खाईल, रडेल पण
- मेट्रो स्टेशन बाहेर भीषण स्फोट!
- सोशल मीडियावर बनावट फोटो


www.mahaenews.com । मंगळवार, दि. 11 नोव्हेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## दिल्ली स्फोट प्रकरणः सीएसटीला पोलिसांचा वेढा; पुण्यातही कडक खबरदारी

# मुंबई-पुण्यात हायअलर्ट!

### लाल किल्ल्याजवळ इको व्हॅनमध्ये भीषण स्फोट; १२ मृत, २४ जखमी–देशभरात सुरक्षा यंत्रणा सज्ज





। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी । महाईन्यूज

**दिल्लीतील स्फोटानंतर मुंबई पोलीस हायअलर्टवर गेले आहेत. देशाची आर्थिक राजधानी असलेल्या या शहरात सुरक्षा यंत्रणांनी रात्रीपासून गस्त वाढवली आहे. मुंबई सीएसटी, दादर, अंधेरी, बोरीवली, ठाणे या प्रमुख रेल्वे स्थानकांवर पोलिसांची तैनाती करण्यात आली आहे. बॉम्बशोधक पथक आणि डॉग स्क्वॉड सतत तपासणी करत आहेत. संशयास्पद पिशव्या, वाहनं, तसेच सोडून दिलेल्या वस्तूंची झाडाझडती घेण्यात येत आहे. लाल किल्ल्याजवळ झालेला हा स्फोट केवळ दिल्लीचा नाही, तर संपूर्ण भारताचा सुरक्षा धक्का आहे. गेल्या काही महिन्यांपासून देशभरात छोटे-मोठे स्फोट, सायबर हल्ले आणि संशयास्पद हालचाली वाढल्या आहेत. सध्या तपास यंत्रणा कार्यरत आहेत, पण नागरिकांनीही सतर्क राहणं हेच काळाचं मागणं आहे. देशाच्या सुरक्षेसाठी एकजूट आणि जागरूकता हीच खरी ढाल ठरणार आहे.**

राजधानी दिल्लीतील ऐतिहासिक लाल किल्ल्याजवळील मेट्रो स्टेशनच्या गेट क्रमांक १ समोरील रस्त्यावर उभ्या असलेल्या इको व्हॅनमध्ये सायंकाळी सुमारे ६:५५ वाजता प्रचंड स्फोट झाला. या स्फोटामुळे आसपासच्या ८ ते १० वाहनांना आग लागली आणि परिसरात भीषण गोंधळ माजला. स्फोटाचा आवाज ३०० मीटरपर्यंत ऐकू आला. या भीषण घटनेत आतापर्यंत १२ जणांचा मृत्यू झाला असून २४ हून अधिक लोक जखमी झाल्याची अधिकृत माहिती समोर आली आहे. स्फोटानंतर लाल किल्ला परिसरात क्षणभरात धुराचे प्रचंड लोट उठले. लोक जीव वाचवण्यासाठी इकडे-तिकडे पळत सुटले. घटनास्थळी तत्काळ दिल्ली पोलिस, अग्निशमन दल, एनएसजी, तसेच बॉम्बशोधक पथक दाखल झाले.

**कारमध्ये नेमकं काय घडलं?**

प्राथमिक माहितीनुसार, इको व्हॅन लाल किल्ल्याच्या परिसरात काही वेळ पार्क केलेली होती. अचानक झालेल्या या स्फोटाने गाडीचे चक्के हवेत उडाले. स्फोटानंतर गाडीतील आग वेगाने पसरत इतर वाहनांनाही भस्मसात केले. स्फोट इतका तीव्र होता की आसपासच्या दुकानदारांच्या काचा फुटल्या,

## पुण्यातही कडक खबरदारी

मुंबईसोबतच पुणे शहरातही हायअलर्ट जारी करण्यात आला आहे. पुणे रेल्वे स्टेशन, शिवाजीनगर, स्वारगेट बसस्थानक या ठिकाणी पोलिसांची विशेष तैनाती करण्यात आली आहे. सायबर सेल व स्थानिक गुप्तचर यंत्रणांना संभाव्य धमक्यांवर लक्ष ठेवण्याचे आदेश दिले गेले आहेत. गेटवे ऑफ इंडिया, मरीन ड्राईव्ह, वडगाव-मावळ, हिंजवडी आयटी पार्क याठिकाणी देखील तपासणी वाढवण्यात आली आहे.

**स्फोटक साहित्याचा सुगावा तपासात मोठा धागा**

फॉरेन्सिक तज्ज्ञांनी घटनास्थळावरून वायरिंग, बॅटरीचे तुकडे आणि स्फोटक पदार्थांचे अवशेष जप्त केले आहेत. हे पुरावे हाती आल्याने स्फोट हाताने घडवून आणला असल्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे. तपास अधिकाऱ्यांच्या मते, व्हॅनमध्ये स्फोटकांची पिशवी, टायमर आणि वायरिंगचे तुकडे सापडले आहेत. हे सगळं पूर्वनियोजित दहशतवादी कटाचं रूप असू शकतं, असं प्राथमिक निष्कर्षात म्हटलं जातं.
दिल्ली पोलिसांच्या विशेष शाखेने या प्रकरणात एक संशयित व्यक्तीला ताब्यात घेतलं असून त्याची चौकशी सुरू आहे. तो स्फोटाच्या वेळी गाडीत असल्याची माहिती समोर आली आहे. जखमी अवस्थेत त्याला एलएनजेपी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्याची कसून चौकशी करण्यात येणार आहे.

**राजधानीत हायअलर्ट — लाल किल्ला परिसर सील**

घटनेनंतर दिल्ली पोलिसांनी संपूर्ण लाल किल्ला परिसर सील केला आहे. एनएसजी (राष्ट्रीय सुरक्षा दल) आणि एनआयए (राष्ट्रीय तपास संस्था) यांच्या टीम्सने तपासाची सूत्रं हाती घेतली आहेत. बॉम्बशोधक कुत्र्यांच्या मदतीने परिसराची झाडाझडती सुरू आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी परिस्थितीचा आढावा घेतला असून "ज्यांनी हा कट रचला, त्यांना वाचता येणार नाही" असं स्पष्ट वक्तव्य त्यांनी केलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही सर्व यंत्रणांना 'जास्तीत जास्त सतर्क राहण्याचे' निर्देश दिले आहेत.

**मुंबईत पोलिसांचा वेढा — सीएसटी, दादर, अंधेरीत गस्त**

पोलिसांच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितलं, "मुंबई ही देशाच्या आर्थिक हालचालींचं हृदय आहे. दिल्लीतील घटनेनंतर आम्ही कोणतीही जोखीम पत्करू शकत नाही. सर्व स्टेशन, मॉल, विमानतळ आणि सार्वजनिक ठिकाणी गस्त तीव्र करण्यात आली आहे."

**राजकीय आणि प्रशासकीय हालचाली**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्फोटाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजीत डोभाल यांच्यासोबत तातडीची बैठक घेतली आहे. गृहमंत्री अमित शाह यांनी दिल्ली पोलिस आणि एनआयएच्या अधिकाऱ्यांना "तपासात कोणतीही ढिलाई न ठेवण्याचे" निर्देश दिले आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रात हायअलर्ट जाहीर करत म्हटलं — "दिल्लीतील स्फोट हा केवळ राजधानीचा प्रश्न नाही, हा राष्ट्रीय सुरक्षा प्रश्न आहे. महाराष्ट्रातील सर्व पोलीस आणि गुप्तचर यंत्रणांनी नागरिकांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य द्यावं."

**देश हादरला — नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण**

राजधानीतील लाल किल्ला हा देशाच्या गौरवाचा आणि पर्यटनाचा प्रतीक आहे. अशा ठिकाणी स्फोट झाल्याने देशभरात भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे.

**नागरिकांसाठी सूचना**

मुंबई पोलिसांनी नागरिकांना सोशल मीडियावर कोणत्याही अफवा न पसरवण्याचे आवाहन केले आहे. संशयास्पद वस्तू, पिशव्या, वाहनं दिसल्यास तातडीने पोलिसांना माहिती देण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. रेल्वे आणि बसस्थानकांवर प्रवाशांची ओळखपत्र तपासणी सुरू आहे. मेट्रो आणि विमानतळावरही अतिरिक्त सुरक्षा तैनात करण्यात आली आहे.

## इंधन भरून टँकर निघाला

## इंधन वाहतूक करणाऱ्या टँकरला आग

# अग्निशमनच्या तत्परतेमुळे अनर्थ टळला

## उडी मारल्याने चालक बचावला

। पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**लोणी काळभोर आगारातून पेट्रोल आणि डिझेल भरून इंधन वाहतूक करणाऱ्या टँकरला आग लागल्याची घटना हडपसरमधील शेवाळवाडी परिसरात घडली. अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन तातडीने आग आटोक्यात आणल्याने अनर्थ टळला. टँकरला आग लागल्यानंतर चालकाने उडी मारल्याने तो बचावला.**



पुणे-सोलापूर रस्त्यावरील शेवाळवाडी चौकात सोमवारी सकाळी नऊच्या सुमारास इंधन वाहतूक करणाऱ्या टँकरला आग लागल्याची माहिती अग्निशमन दलाच्या नियंत्रण कक्षाला मिळाली. त्यानंतर हडपसर, काळेपडळ, बी. टी. कवडे रस्ता, खराडी अग्निशमन केंद्रातील बंब आणि टँकर घटनास्थळी दाखल झाले.टँकरमध्ये इंधन असल्याने जवानांनी तातडीने पाण्याचा मारा करून आग आटोक्यात आणली. टँकरमध्ये १५ हजार लिटर डिझेल आणि पाच हजार लिटर पेट्रोल होते. लोणी काळभोरमधील आगारातून इंधन भरून टँकर चालक पुण्याकडे निघाला होता. अग्निशमन दलाच्या जवानांच्या तत्परतेमुळे अनर्थ टळला. टँकरला आग लागल्याची माहिती मिळताच चालकाने उडी मारल्याने तो बचावला.अग्निशमन अधिकारी प्रमोद सोनवणे, नीलेश लोणकर, नारायण जगताप, राजू शेख, शौकत शेख, बाबा चव्हाण, चंद्रकांत चव्हाण, रामदास लाड, अविनाश ढाकणे यांनी ही कामगिरी केली. टँकरमध्ये मोठ्या प्रमाणावर इंधन होते. टँकरला आग लागल्यानंतर अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन आग आटोक्यात आणली. जवानांच्या तत्परतेमुळे मोठी दुर्घटना टळलीलोणी काळभोर आगारातून पेट्रोल आणि डिझेल भरून इंधन वाहतूक करणाऱ्या टँकरला आग लागल्याची घटना हडपसरमधील शेवाळवाडी परिसरात घडली. अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन तातडीने आग आटोक्यात आणल्याने अनर्थ टळला. टँकरला आग लागल्यानंतर चालकाने उडी मारल्याने तो बचावला. पुणे-सोलापूर रस्त्यावरील शेवाळवाडी चौकात सोमवारी सकाळी नऊच्या सुमारास इंधन वाहतूक करणाऱ्या टँकरला आग लागल्याची माहिती अग्निशमन दलाच्या नियंत्रण कक्षाला मिळाली.

त्यानंतर हडपसर, काळेपडळ, बी. टी. कवडे रस्ता, खराडी अग्निशमन केंद्रातील बंब आणि टँकर घटनास्थळी दाखल झाले.

### जवानांच्या तत्परतेमुळे अनर्थ टळला

त्यानंतर हडपसर, काळेपडळ, बी. टी. कवडे रस्ता, खराडी अग्निशमन केंद्रातील बंब आणि टँकर घटनास्थळी दाखल झाले. टँकरमध्ये इंधन असल्याने जवानांनी तातडीने पाण्याचा मारा करून आग आटोक्यात आणली. टँकरमध्ये १५ हजार लिटर डिझेल आणि पाच हजार लिटर पेट्रोल होते. लोणी काळभोरमधील आगारातून इंधन भरून टँकर चालक पुण्याकडे निघाला होता. अग्निशमन दलाच्या जवानांच्या तत्परतेमुळे अनर्थ टळला.

टँकरमध्ये इंधन असल्याने जवानांनी तातडीने पाण्याचा मारा करून आग आटोक्यात आणली. टँकरमध्ये १५ हजार लिटर डिझेल आणि पाच हजार लिटर पेट्रोल होते. लोणी काळभोरमधील आगारातून इंधन भरून टँकर चालक पुण्याकडे निघाला होता. अग्निशमन दलाच्या जवानांच्या तत्परतेमुळे अनर्थ टळला. टँकरला आग लागल्याची माहिती मिळताच चालकाने उडी मारल्याने तो बचावला.अग्निशमन अधिकारी प्रमोद सोनवणे, नीलेश लोणकर, नारायण जगताप, राजू शेख, शौकत शेख, बाबा चव्हाण, चंद्रकांत चव्हाण, रामदास लाड, अविनाश ढाकणे यांनी ही कामगिरी केली. टँकरमध्ये मोठ्या प्रमाणावर इंधन होते. टँकरला आग लागल्यानंतर अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन आग आटोक्यात आणली. जवानांच्या तत्परतेमुळे मोठी दुर्घटना टळलीलोणी काळभोर आगारातून पेट्रोल आणि डिझेल भरून इंधन वाहतूक करणाऱ्या टँकरला आग लागल्याची घटना हडपसरमधील शेवाळवाडी परिसरात घडली. अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन तातडीने आग आटोक्यात आणल्याने अनर्थ टळला. टँकरला आग लागल्यानंतर चालकाने उडी मारल्याने तो बचावला. पुणे-सोलापूर रस्त्यावरील शेवाळवाडी चौकात सोमवारी सकाळी नऊच्या सुमारास इंधन वाहतूक करणाऱ्या टँकरला आग लागल्याची माहिती अग्निशमन दलाच्या नियंत्रण कक्षाला मिळाली.

# हॉर्नने घेतला दुचाकीस्वार तरुणाचा बळी

## डंपरचालकाने हॉर्न वाजविल्यानंतर घाबरलेला तरुण पडल्याने दुर्घटना

। पुणे ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**कर्णकर्कश हॉर्न वापरण्यावर बंदी आहे. अशा प्रकारचे हॉर्न वापरणाऱ्या वाहन चालक, तसेच फटाक्यासारखा आवाज निर्माण करणारे हॉर्नवर बंदी असताना शहरात सर्रास अशा प्रकारचे हॉर्न वाहनचालक वापरत असल्याचे दिसून आले आहे. नगर रस्त्यावरील विमाननगर भागात डंपर चालकाने कर्णकर्कश हॉर्न वाजविल्याने दुचाकीस्वार तरुणाचे नियंत्रण सुटले आणि तो रस्त्यात पडला. भरधाव डंपरच्या चाकाखाली सापडून त्याचा मृत्यू झाल्याची दुर्देवी घटना रविवारी मध्यरात्री घडली.**




सचिन वसंत धुमाळ (वय २८, रा. मल्हार नगर, वडगाव शेरी) असे मृत्युमुखी पडलेल्या दुचाकीस्वार तरुणाचे नाव आहे. याबाबत स्वप्नील भानुदास माने (वय २५, रा. बालाजी पीजी, सोमनाथनगर,वडगाव शेरी, मूळ रा. रावरगांव, ता. सेलू, जि. परभणी) याने विमानतळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या अपघातानंतर पसार झालेल्या डंपर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसानी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी मध्यरात्री बाराच्या सुमारास भरधाव डंपर नगर रस्त्यावरुन निघाला होता. दुचाकीस्वार सचिन धुमाळ आणि स्वप्नील माने हे विमाननगरमधील टाटा गार्डन चौकातून निघाले होते. त्यावेळी पाठीमागून भरधाव वेगात येणाऱ्या डंपर चालकाने जोरात हॉर्न वाजविला. कर्णकर्कश हॉर्नच्या आवाजामुळे दुचाकीस्वार सचिन घाबरला आणि त्याचे नियंत्रण सुटले. दुचाकी घसरल्यानंतर सचिन आणि त्याचा मित्र स्वप्नील हे रस्त्यात पडले. त्यावेळी पाठीमागून भरधाव वेगात येणाऱ्या डंपरच्या चाकाखाली सापडून सचिनचा मृत्यू झाला.

### पोलिसांची मोहीम थंडावली

झालेल्या डंपर चालकाचा शोध घेण्यात येत असून, पोलिसांनी सीसीटीव्ही चित्रीकरण तपासले आहे. सहायक पोलीस निरीक्षक समीर करपे तपास करत आहेत.कर्णकर्कश हॉर्न वापरणारे वाहन चालक, तसेच फटाक्यांसारखा आवाज निघणारे हॉर्न वापरणाऱ्या बुलेटस्वारांविरुद्ध वाहतूक पोलिसांसह शहरातील वेगवेगळ्या पोलीस ठाण्यातील पथकांनी कारवाईचा बडगा उगारला होता. अशा प्रकारचे हॉर्न वापरणाऱ्या चालकांविरुद्ध खटले दाखल करून पोलिसांनी हॉर्न जप्त केले होते. जप्त केलेल्या हॉर्नवर पोलिसांनी बुलडोझर चालवून ते नष्ट केले होते.

‘स्मार्ट सिटी एक्स्पो वर्ल्ड कॉंग्रेस २०२५’ पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या...

# शाश्वत विकासकामांचा जागतिक पातळीवर सन्मान!

## बार्सिलोना येथे झालेल्या ‘स्मार्ट सिटी एक्स्पो वर्ल्ड कॉंग्रेस २०२५’ मध्ये सहभाग...



| पिंपरी चिंचवड |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने पुन्हा एकदा आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली ओळख मजबूत केली आहे. स्पेनमधील बार्सिलोना येथे ४ ते ६ नोव्हेंबरदरम्यान झालेल्या ‘स्मार्ट सिटी एक्स्पो वर्ल्ड कॉंग्रेस २०२५’ दरम्यान आयोजित ‘आंतरराष्ट्रीय शहरी आणि प्रादेशिक सहकार्य (IURC) ग्लोबल थीमॅटिक नेटवर्किंग कार्यशाळेत’ सहभागी होण्यासाठी भारतातील सहा पायलट शहरांपैकी एक म्हणून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला आमंत्रित करण्यात आले होते.**

सदर कार्यशाळेत मुख्य अभियंता संजय कुलकर्णी आणि सहशहर अभियंता बापू गायकवाड यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे प्रतिनिधित्व केले. शहरी गतिशीलता, हवामान बदलास अनुरूप नियोजन, आणि शाश्वत वाहतूक यांसारख्या विषयांवर केंद्रित सत्रांमध्ये त्यांनी जगभरातील शहर प्रतिनिधींशी अनुभव आणि कल्पनांची देवाणघेवाण केली.

या कार्यशाळेदरम्यान ल्यूवेन, हॅम्बुर्ग आणि व्हिक्टोरिया यांसारख्या शहरांसोबत ‘वेस्ट-टू-एनर्जी’, ‘हरित वाहतूक प्रणाली’ आणि ‘स्मार्ट शहरी उपाय’ या विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. या चर्चांमधून जगातील अनेक शहरे पर्यावरणीय आव्हानांना तोंड देण्यासाठी नवोपक्रम आणि भागीदारीच्या माध्यमातून कसे प्रयत्नशील आहेत याची महत्त्वपूर्ण माहिती मिळाली.

महानगरपालिका सध्या हवामान अनुकूल विकास, हरित गतिशीलता, कचरा व्यवस्थापन आणि ऊर्जा कार्यक्षमतेसाठी नाविन्यपूर्ण उपाययोजना राबवित आहे. आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या माध्यमातून महानगरपालिका जागतिक पातळीवरील सर्वोत्तम शहरी धोरणे आत्मसात करण्याच्या दिशेने प्रयत्नशील आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरील हा सहभाग पिंपरी चिंचवड शहरासाठी एक मोठी उपलब्धी असून, महानगरपालिका जागतिक दर्जाच्या शाश्वत आणि स्मार्ट शहरांच्या यादीत स्वतःची ओळख अधिक दृढ करत आहे.

> “ पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सातत्यपूर्ण आणि नियोजनबद्ध प्रयत्नांमुळे शहरात शाश्वत वाहतूक व्यवस्थेची पायाभरणी झाली आहे. हरित सेतू व टेल्को रोडसारखे प्रकल्प हे केवळ पायाभूत सुविधा नसून, नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी,आरोग्यदायी आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीकडे नेणारे उपक्रम आहेत. केंद्र सरकारकडून मिळालेला ‘शहरी वाहतूक उत्कृष्टता पुरस्कार’ हा पिंपरी चिंचवडच्या सर्व नागरिकांचा आहे आणि भविष्यातील शाश्वत विकासाच्या दिशेने आमच्या बांधिलकीला बळ देणारा आहे.
>
> **– श्रावण हर्डीकर,** आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

> “ पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला या जागतिक परिषदेत स्थान मिळणे हे शहराच्या शाश्वत विकासाच्या प्रयत्नांची दखल आहे. या माध्यमातून आम्हाला विविध देशांतील शहरांचे यशस्वी अनुभव आणि नवीन तंत्रज्ञान जाणून घेण्याची संधी मिळाली, जी भविष्यातील प्रकल्पांसाठी उपयुक्त ठरेल.
>
> **–संजय कुलकर्णी,** मुख्य अभियंता, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

> “ शाश्वत वाहतूक, स्वच्छ ऊर्जा आणि नागरिक केंद्रित नियोजन ही आजच्या शहरी विकासाची गरज आहे. या परिषदेमधील चर्चांमुळे आम्हाला जागतिक दर्जाच्या संकल्पना आणि उपाययोजना शहरात लागू करण्याची प्रेरणा मिळाली.
>
> **– बापू गायकवाड,** सह शहर अभियंता, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

# आज पिंपरी चिंचवड महापालिकेची आरक्षण सोडत

## पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार सोडत कार्यक्रम

| पिंपरी चिंचवड | प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नियोजित सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने आरक्षण सोडत कार्यक्रम ११ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे होणार आहे. राज्य निवडणूक आयोगाने या आरक्षण सोडतीच्या कामासाठी पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. सदर सोडत त्यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार असून या आरक्षण सोडतीच्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या निवडणूक विभागाची तयारी पूर्ण झाली आहे.**

डॉ. पुलकुंडवार यांनी आरक्षण सोडतीच्या अनुषंगाने निवडणूक विभागाने केलेल्या तयारीची संपूर्ण माहिती घेतली. तसेच आरक्षण सोडतीच्या दिवशी सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. यावेळी पोलीस प्रशासन व महापालिकेच्या सुरक्षा विभागाच्या वतीने ११ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या आरक्षण सोडतीच्या अनुषंगाने प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह व परिसरातील सुरक्षेचा आढावा घेण्यात आला.

....

**शासकीय वाहने वगळता सर्व प्रकारच्या वाहनांना बंदी**

११ नोव्हेंबर २०२५ रोजी चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नियोजित सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने आरक्षण सोडत होणार आहे. त्यामुळे ११ नोव्हेंबर रोजी प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह परिसरात शासकीय वाहने वगळता सर्व प्रकारच्या वाहनांना बंदी असणार आहे. तरी आरक्षण सोडतीच्या ठिकाणी खासगी वाहने आणू नयेत, असे आवाहन महापालिकेच्या निवडणूक विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.




### चार टप्प्यात पार पडणार आरक्षण सोडत

१) पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रभागांमध्ये राखीव जागा वाटप करून नियम २०२५ नुसार प्रथम अनुसूचित जाती महिला आरक्षण सोडत काढणे.
२) अनुसूचित जमाती महिला आरक्षण सोडत काढणे.
३) नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाची सोडत काढणे व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिलांकरीता वाटप करणे. नियमानुसार कारवाई करणे.
४) सर्व साधारण महिलांकरीता जागा नेमून देणे.

# शेतकऱ्यांना सोयाबीन रडवणार?



भूमिका

**प्रत्येक वेळी भाषणांचा सूर शेतकरीकेंद्री ठेवायचा आणि हित जोपासण्याची वेळ आली की ग्राहकांचा विचार करायचा ही सगळ्याच सरकारांची नेहमीची सवय. याला केंद्रातले विद्यमान मोदी सरकारही अपवाद नाही. सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांची सध्याची परवड हेच दाखवून देते. कमी खर्चात होणारे व रोखीने पैसा देणारे पीक म्हणून अलीकडे शेतकरी सोयाबीनकडे वळले.**

गेल्या पाच वर्षांत या पिकाच्या लागवड क्षेत्रात सतत वाढ होताना दिसते. यंदा हे क्षेत्र पाच लाख हेक्टरने वाढले. हे पाहता केंद्र व राज्य सरकारांनी सोयाबीनवरील संशोधन, त्यावर आधारित प्रक्रिया उद्योग यांना चालना देणे गरजेचे होते. तसे काहीच न झाल्याने सध्या हे उत्पादक गंभीर आर्थिक संकटात सापडले आहेत. भाजपला याचा जोरदार फटका अलीकडे झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत महाराष्ट्रात बसला. विदर्भ तसेच मराठवाडा या सोयाबीनच्या प्रदेशात ऐन प्रचाराच्या धामधुमीत शेतकऱ्यांचा आक्रोश अनुभवायला मिळाला. त्यापासून बोध घेण्याचे सौजन्य राज्य व केंद्र दाखवत नसल्याचे सध्याचे चित्र आहे. सध्या सोयाबीनचा बाजारभाव केवळ चार हजार रुपये प्रतिक्विंटल, म्हणजे सरकारने जाहीर केलेल्या हमीभावापेक्षा ८९२ रुपयांनी कमी आहे. अशा वेळी बाजारात हस्तक्षेप करण्याची



धमक सरकार का दाखवत नाही? केवळ प्रोत्साहनपर मदत वा भरपाई जाहीर करून शेतकऱ्यांना दिलासा देता येणे शक्य नाही हे सरकारला ठाऊक नाही का? कुण्या एका आवडीच्या उद्योगपतीला या मंदीचा फायदा घेऊन जास्तीत जास्त खाद्यातेल आयात करता यावे यासाठी सरकारचे हे दुर्लक्ष सुरू आहे का? जनधन, लखपती व करोडपती दीदी अशा आकर्षक योजनांकडे लक्ष वेधण्याबरोबरच शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा जास्त दर मिळेल याकडे लक्ष का दिले जात नाही, असे प्रश्न निर्माण होतात.देशात सोयाबीनची ८० टक्के लागवड महाराष्ट्र तसेच मध्य प्रदेशात होते. मध्य प्रदेशातील शेतकऱ्यांनी लोकसभेत भाजपला साथ दिली. पण आता तिथेही या उत्पादकांचे आंदोलन जोर धरू लागले आहे. तेही देशाचे कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान ज्या सिहोरमधून निवडून आले तिथेच. मावळा प्रांतात सुरू झालेले हे आंदोलन लवकरच सर्वत्र पसरेल असे चित्र आहे. कारण बाजारात नवीन सोयाबीन यायला वेळ आहे. ते आल्यावर भाव आणखी पडतील. सध्याच्या या पडझडीला आंतरराष्ट्रीय बाजारातील परिस्थिती कारणीभूत आहे. तिथे सध्या फक्त तीन हजार रुपये एवढाच दर आहे हा सरकारचा युक्तिवाद फारच वरवरचा, शेतकऱ्यांची दिशाभूल करणारा आणि तात्कालिक आहे. देशभरातील लाखो शेतकरी सोयाबीनकडे वळत असताना सरकारने या पिकाची उत्पादकता वाढावी यासाठी आजवर काहीही केले नाही. सध्या भारतात ही उत्पादकता हेक्टरी दहा ते १३ क्विंटल आहे तर ब्राझीलमध्ये ३३ क्विंटल. हेक्टरी उत्पादन वाढावे यासाठी बियाण्यांवर संशोधन करणे, प्रक्रिया उद्योगाचे जाळे उभारण्याला प्रोत्साहन देणे हे सरकारचे काम. त्यातील अपयशाकडे होणारे दुर्लक्ष तेल आयात उद्योगात सक्रिय असणाऱ्यांच्या फायद्यासाठी आहे का? प्रक्रिया उद्योगांचे जाळे उभारले तर आयातीच्या क्षेत्रात असलेली काही मोजक्यांची मक्तेदारी मोडीत निघेल अशी भीती कदाचित सरकारला वाटत असावी. महाराष्ट्रात गेल्या दहा वर्षांत सोयाबीनवर प्रक्रिया करणारे ६५ उद्योग सुरू झाले. आता त्यातले केवळ ३० कसेबसे सुरू आहेत. त्यांच्या अडचणी सरकारने कधी जाणून घेतल्या का? अशा लहान व मध्यम स्वरूपाच्या उद्योगांचे जाळे देशभर विणले जाणे हे कधीही शेतकऱ्यांच्या हिताचे. मात्र विद्यमान सरकारला अशा विकेंद्रीकरणाऐवजी केंद्रीकरणातच रस दिसतो. कारण तरच बड्या उद्योगसमूहांचे हित जोपासता येते.आजघडीला भारत सोयाबीन उत्पादनात जगात पाचव्या क्रमांकावर आहे. सर्वच क्षेत्रांत पहिल्या तीनमध्ये येण्याची घाई झालेल्या केंद्र सरकारला या क्षेत्रातही अशी भरारी गाठावी असे का वाटत नाही? कृषिक्षेत्राशी संबंधित अडचणी उद्भवतात तेव्हा रोख मदत करून शेतकऱ्यांचा रोष शांत करणे यालाच प्राधान्य देण्याचे काम सरकारे करत आली

## प्रासंगिक »

### हे कराच!

***अजितदादांवर आरोप होतील अशी व्यवस्था करायची आणि अजितदादांनी मी काहीही चूक केलेली नाही असे सांगायचे हे दोन्ही एकाच वेळी खरे असू शकत नाही...***

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या चिरंजिवांचा कथित भूखंड घोटाळा उघड झाला; यात आश्चर्य नाही. त्याआधी त्यांच्या अन्य सत्पुत्रास मिळालेल्या मद्यानिर्मिती कंत्राटांचे वृत्त घोटाळा न म्हणता चर्चिले गेले. तीर्थरूप उपमुख्यमंत्री अजितदादा मद्याविषयक अबकारी कर धोरणविषयक समितीचे प्रमुख. आणि त्यांच्याच वंशाच्या दिव्यास मद्यानिर्मितीची कंत्राटे मिळाली याचे अलीकडील नवनैतिकवाद्यांस काहीही वाटले नाही. यातही आश्चर्य नाही. याच मंत्रिमंडळातील अन्य ज्येष्ठ मंत्री धनंजय मुंडे यांचा भलताच हिंस्रा घोटाळा उघड झाला आणि त्यांना पायउतार व्हावे लागले. याच मंत्रिमंडळातील संजय शिरसाट, प्रताप सरनाईक असे महाभाग काही ना काही आरोपांमुळे चर्चेत राहिले. त्यांची खिंड अजितदादांचा सह-उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे प्राणपणाने लढवत असल्यामुळे अद्याप त्यांच्याकडील कोणास राजीनामा द्यावा लागलेला नाही.

सर्वोच्च न्यायालयाच्या आधी ब्रिटिश काळात फेडरल कोर्ट होते. त्याला आधार १९३५ च्या भारत सरकार कायद्याचा होता. नव्याने स्थापन केलेल्या सर्वोच्च न्यायालयाची रचना निर्धारित करणे हे सुरुवातीला संविधानकर्त्यांसमोर आणि नंतर संसदेसमोर आव्हान होते.

## संविधानाच्या तटबंदीचे संरक्षक

संविधानसभेने सुरुवातीला सरन्यायाधीश आणि इतर सात न्यायाधीश अशा आठ जणांचे सर्वोच्च न्यायालय असेल अशी तरतूद केली. सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची एकूण संख्या वाढवण्याचा किंवा कमी करण्याचा अधिकार संसदेला असेल, असेही तेव्हाच ठरवण्यात आले. त्यानुसार टप्प्याटप्प्याने न्यायाधीशांची संख्या वाढवण्यात आली. सध्या २०२४ मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांची संख्या सरन्यायाधीशांसह ३४ इतकी आहे.सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून नियुक्त होण्यासाठी पात्रता काय असते? सर्वोच्च न्यायालयाचा न्यायाधीश होण्यासाठी दोन प्रमुख अटी आहेत: (१) ती व्यक्ती भारताची नागरिक असावी. (२अ) त्या व्यक्तीला उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशपदाचा किमान ५ वर्षांचा अनुभव असावा. (२ ब) त्या व्यक्तीला उच्च न्यायालयात किमान १० वर्षे वकिलीचा अनुभव असावा. (क)



राष्ट्रपतींच्या मते सदर व्यक्ती ही विख्यात कायदेतज्ज्ञ असावी. या अटींची पूर्तता होत असेल तर त्या व्यक्तीची नियुक्ती सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशपदी होऊ शकते.सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना पदावर नियुक्त होत असताना राष्ट्रपतींच्या उपस्थितीत संविधानाची शपथ घ्यावी लागते. संविधानाप्रतिच्या निष्ठेबाबत आणि भारताचे सार्वभौमत्व, अखंडत्व टिकेल, अशा वर्तनाबाबत ही शपथ आहे. न्यायाधीशांचे वेतन, भत्ते याबाबत संसद निर्णय घेते. एकत्रित निधीतून या वेतनाचे नियोजन केले जाते. न्यायाधीशांचा कार्यकाळ निश्चित नाही, मात्र वय वर्षे ६५पर्यंत ते कार्यरत राहू शकतात. त्यानंतर ते सेवानिवृत्त होतात. त्याआधी ते राष्ट्रपतींना राजीनामा पत्र लिहून सेवेतून मुक्त होऊ शकतात किंवा राष्ट्रपती त्यांना पदावरून दूर करू शकतात. राष्ट्रपतींनी सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना पदावरून दूर करण्यासाठी मुख्यत: दोन कारणे पुरेशी असतात: (१) सिद्ध झालेले गैरवर्तन (२) अकार्यक्षमता. पदावरून काढण्यासाठीची प्रक्रिया १९६८ सालच्या न्यायाधीश चौकशी कायद्यात दिलेली आहे. त्यानुसार लोकसभेच्या १०० किंवा राज्यसभेच्या ५० सदस्यांनी प्रस्ताव सादर करावा लागतो. तो अध्यक्षांनी किंवा सभापतींनी पटलावर ठेवण्यास परवानगी दिली की चौकशी समिती स्थापन केली जाते. या चौकशी समितीनुसार न्यायाधीश दोषी सिद्ध झाल्यानंतर त्यांना पदावरून मुक्त करण्याचा ठराव संसदेसमोर ठेवला जातो. याला महाभियोगाचा ठराव म्हणतात.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## बाळासाहेब कावरे विजयी

## माजी नगराध्यक्ष विजय औटींनी 'व्हिप' धुडकावला

# पारनेर नगराध्यक्षपदी डॉ. कावरे!

## महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला गती



। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पारनेर नगरपंचायतीच्या नगराध्यक्षपदाच्या आज, सोमवारी झालेल्या निवडणुकीत महाविकास आघाडीच्या डॉ. विद्या बाळासाहेब कावरे विजयी झाल्या. या विजयाने महायुतीच्या राजकीय घोडेबाजाराला चपराक बसल्याचा आरोप खासदार नीलेश लंके यांनी केला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) बंडखोर नगरसेवक, माजी नगराध्यक्ष विजय औटी यांनी पक्षादेश ('व्हिप') धुडकावत महायुतीचे उमेदवार नगरसेवक अशोक चेडे यांच्या बाजूने मतदान केले.**

नगराध्यक्ष नितीन अडसूळ यांच्या राजीनाम्यानंतर रिक्त झालेल्या पदासाठी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी आज विशेष सभा आयोजित केली होती. उपविभागीय अधिकारी श्रीकुमार चिंचकर हे पीठासीन अधिकारी म्हणून उपस्थित होते. हात वर करून मतदान घेण्यात आले. निवडणुकीत डॉ. कावरे यांना ११, तर चेडे यांना ६ मते मिळाली.या राजकीय घडामोडीत महाविकास आघाडीच्या नगरसेवकांनी पक्षनिष्ठा अबाधित ठेवली. नितीन अडसूळ, जायदा शेख,सुरेखा भालेकर,योगेश मते, भूषण शेलार, प्रियंका औटी, नीता औटी, सुप्रिया शिंदे, हिमानी नगरे, विद्या गंधाडे आणि स्वतः डॉ. विद्या कावरेसह ११ नगरसेवकांनी मतदान करून विजय निश्चित केला. विरोधी उमेदवार अशोक चेडे यांना विजय सदाशिव औटी, युवराज पठारे, नीता ठुबे, नवनाथ सोबले आणि कांताबाई ठाणगे या ६ नगरसेवकांचा पाठिंबा मिळाला. राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) गटनेते योगेश मते यांनी शनिवारीच ९ नगरसेवकांना व्हिप बजावत 'डॉ. विद्या कावरे यांनाच मतदान करावे' असे निर्देश दिले होते. नगराध्यक्षपदी निवड झाल्यानंतर डॉ. विद्या कावरे यांचा सभागृहात सत्कार करण्यात आला. समर्थकांनी फटाके फोडत आनंदोत्सव साजरा केला.निवडीनंतर खासदार नीलेश लंके यांनी नगरसेवक एकनिष्ठ राहिल्याचे कौतुक केले. ते म्हणाले, 'राजकारणात निष्ठा सर्वांत मोठी असते. मोठे आमिष असतानाही 'मविआ'चे नगरसेवक डगमगले नाहीत, हीच खरी आमची ताकद आहे. डॉ. विद्या कावरे यांच्या विजयाने आगामी सार्वत्रिक निवडणुकांच्या विजयाची नांदी झाली आहे, तर आमच्या सर्व कुटुंबाला व नगरसेवकांच्या निष्ठेला न्याय मिळाल्याची प्रतिक्रिया नगराध्यक्ष डॉ. विद्या कावरे व डॉ. बाळासाहेब कावरे यांनी व्यक्त केली. पारनेर नगरपंचायतीच्या नगराध्यक्षपदाच्या आज, सोमवारी झालेल्या निवडणुकीत महाविकास आघाडीच्या डॉ. विद्या बाळासाहेब कावरे विजयी झाल्या. या विजयाने महायुतीच्या राजकीय घोडेबाजाराला चपराक बसल्याचा आरोप खासदार नीलेश लंके यांनी केला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) बंडखोर नगरसेवक, माजी नगराध्यक्ष विजय औटी यांनी पक्षादेश ('व्हिप') धुडकावत महायुतीचे उमेदवार नगरसेवक अशोक चेडे यांच्या बाजूने मतदान केले. नगराध्यक्ष नितीन अडसूळ यांच्या राजीनाम्यानंतर रिक्त झालेल्या पदासाठी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी आज विशेष सभा आयोजित केली होती. उपविभागीय अधिकारी श्रीकुमार चिंचकर हे पीठासीन अधिकारी म्हणून उपस्थित होते. हात वर करून मतदान घेण्यात आले. निवडणुकीत डॉ. कावरे यांना ११, तर चेडे यांना ६ मते मिळाली.या राजकीय घडामोडीत महाविकास आघाडीच्या नगरसेवकांनी पक्षनिष्ठा अबाधित ठेवली. नितीन अडसूळ, जायदा शेख,सुरेखा भालेकर,योगेश मते, भूषण शेलार, प्रियंका औटी, नीता औटी, सुप्रिया शिंदे, हिमानी नगरे, विद्या गंधाडे आणि स्वतः डॉ. विद्या कावरेसह ११ नगरसेवकांनी मतदान करून विजय निश्चित केला. विरोधी उमेदवार अशोक चेडे यांना विजय सदाशिव औटी, युवराज पठारे, नीता ठुबे, नवनाथ सोबले आणि कांताबाई ठाणगे या ६ नगरसेवकांचा पाठिंबा मिळाला.

### हीच खरी आमची ताकद आहे

योगेश मते यांनी शनिवारीच ९ नगरसेवकांना व्हिप बजावत 'डॉ. विद्या कावरे यांनाच मतदान करावे' असे निर्देश दिले होते. नगराध्यक्षपदी निवड झाल्यानंतर डॉ. विद्या कावरे यांचा सभागृहात सत्कार करण्यात आला. समर्थकांनी फटाके फोडत आनंदोत्सव साजरा केला.निवडीनंतर खासदार नीलेश लंके यांनी नगरसेवक एकनिष्ठ राहिल्याचे कौतुक केले. ते म्हणाले, 'राजकारणात निष्ठा सर्वांत मोठी असते. मोठे आमिष असतानाही 'मविआ'चे नगरसेवक डगमगले नाहीत, हीच खरी आमची ताकद आहे.

# बिबट्याच्या हल्ल्यात वृद्धा ठार

## चार दिवसांत दुसरी घटना; ग्रामस्थांचा रास्तारोको

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**चार दिवसांपूर्वी टाकळी शिवारात (ता. कोपरगाव) ऊसतोडणी कामगाराच्या तीनवर्षीय मुलीवर बिबट्याने केलेल्या हल्ल्यात तिचा दुर्दैवी अंत झाल्याची घटना ताजी असतानाच आज, सोमवारी सकाळी येसगाव शिवारात (ता. कोपरगाव) भास्कर वस्ती येथे शेतात काम करणाऱ्या एका वृद्धेवर बिबट्याने हल्ला केला, त्यात महिलेचा मृत्यू झाला.**

या घटनेनंतर संतप्त ग्रामस्थांनी नगर-मनमाड महामार्गावर रास्ता रोको केल्याने दोन्ही बाजूंनी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. शांताबाई अहिलाजी निकोले (वय ६०) असे बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झालेल्या महिलेचे नाव आहे. चार दिवसांपूर्वी कोपरगाव तालुक्यातील टाकळी शिवारात ऊसतोडणी कामगाराच्या तीनवर्षीय चिमुकलीवर बिबट्याने हल्ला केला होता यात त्या चिमुकलीचा दुर्दैवी अंत झाला होता. त्यानंतर संतप्त ग्रामस्थांनी टाकळी फाटा येथे रास्ता रोको आंदोलन केले होते. त्यानंतर अधिकाऱ्यांनी घटनास्थळी येऊन लवकरच नरभक्षक बिबट्याला जेरबंद करू, असे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले होते.बिबट्याच्या हल्ल्यांमुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असताना आज सकाळी शांताबाई शेतात चारा कापत असताना बिबट्याने त्यांच्यावर अचानक झडप घातली. हा हल्ला अचानक आणि जोरदार होता, की वृद्धेला सुटकेची संधीच मिळाली नाही.



तिचा जागीच मृत्यू झाला. संतप्त ग्रामस्थांनी नगर-मनमाड महामार्गावर उतरून पुन्हा रास्ता रोको आंदोलन केले. शेतकऱ्यांनी वन विभागाच्या ढिसाळ कारभाराबाबत तीव्र संताप व्यक्त केला. सलग तीन हल्ल्यांनंतरही वनविभाग आणि प्रशासन याकडे डोळेझाक करते आहे का, असा प्रश्न ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे. या नरभक्षक बिबट्याला पकडण्यासाठी विशेष पथक नेमावे आणि परिसरात पिंजरे लावावेत, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.या घटनेची माहिती मिळाल्यानंतर आमदार आशुतोष काळे व माजी आमदार स्नेहलता कोल्हे तातडीने घटनास्थळी पोहोचले. आमदार काळे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी संपर्क साधत, तर स्नेहलता कोल्हे यांनी वनमंत्री गणेश नाईक यांच्याशी संपर्क साधत नरभक्षक बिबट्याला ठार करा, अशी मागणी केली.

### अन्य एक महिला बचावली

कोपरगाव तालुक्यात आज एकाच दिवशी दोन महिलांवर बिबट्याने हल्ला केल्याच्या दोन घटना घडल्या आहेत. येसगाव शिवारात वृद्ध महिलेचा जागीच मृत्यू झाला, तर दुसरी घटना सुरेगावमध्ये अनिल वाबळे यांच्या शिवारात घडली. तेथे शेतात कापूस वेचत असलेल्या दुसऱ्या महिलेवर बिबट्याने हल्ला करण्याचा प्रयत्न केला.

## दिल्लीत 'हाय अलर्ट' ८ जणांचा मृत्यू, अनेक जण जखमी

# लाल किल्ला मेट्रो स्टेशन बाहेर भीषण स्फोट!

## कारमध्ये स्फोट झाल्याची घटना समोर



।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**राजधानी दिल्लीमधील लाल किल्ल्याच्या जवळ हाय सेक्युरिटी झोन असलेल्या भागात एका कारमध्ये स्फोट झाल्याची माहिती समोर आली आहे. या स्फोटानंतर जवळपासच्या गाड्यांनी देखील पेट घेतल्याची माहिती मिळत आहे आहे. या स्फोटानंतर अग्निशमन दल आणि पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. दरम्यान या स्फोटात किमान ८ जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाल्याची महिती मिळत आहे. हे आकडे वाढण्याची शक्यता आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी संध्याकाळी ६.३० वाजण्याच्या सुमारास हा स्फोट झाला. दरम्यान अग्निशमन दलाच्या सुमारे सात गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या आहेत. स्फोटाचे नेमके कारण अद्याप कळू शकलेले नाही.दिल्ली अग्निशमन दलाने दिलेल्या माहितीनुसार, लाल किल्ला मेट्रो स्टेशनच्या गेट क्रमांक १ जवळ एका कारमध्ये स्फोट झाल्याची माहिती मिळाली. या स्फोटानंतर तीन ते चार अन्य वाहनांनाही आग लागली आणि त्यांचे नुकसान झाले. दरम्यान या स्फोटानंतर दिल्लीत हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. दिल्लीतील लाल किल्ला मेट्रो स्टेशनच्या गेट क्रमांक १ जवळ झालेल्या स्फोटाच्या पार्श्वभूमीवर उत्तर प्रदेशात सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. एएनआयशी (ANI) बोलताना, उत्तर प्रदेशचे एडीजी कायदा व सुव्यवस्था अमिताभ यश यांनी सांगितले की, डीजीपींनी उत्तर प्रदेशातील सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांना संवेदनशील धार्मिक स्थळे, संवेदनशील जिल्हे आणि सीमावर्ती भागांमध्ये सुरक्षा वाढवण्याचे निर्देश दिले आहेत. सर्व सुरक्षा यंत्रणांनाही सतर्क करण्यात आले आहे. उत्तर प्रदेशातील सर्व जिल्ह्यांमध्ये पोलिसांना सतर्क राहण्याचे आदेश दिले आहेत. संवेदनशील भागांमध्ये गस्त आणि तपासणी वाढवण्याचे आदेश लखनऊ येथून जारी करण्यात आले आहेत.दिल्लीतील स्फोटानंतर माहिती देताना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले की, सुभाष मार्ग ट्राफिक सिग्नलवर आय २० ह्युंदाई गाडीत एक स्फोट झाला आहे. स्फोटामुळे जवळपासच्या गाड्या आणि रस्त्यावरून जाणारे लोक जखमी झाल्याची महिती आहे. प्राथमिक माहितीनुसार काही लोकांचा मृत्यूही झाला आहे. स्फोटाची माहिती मिळताच १० मिनिटांत दिल्ली गुन्हे शाखा, दिल्ली स्पेशल ब्रांचची पथके घटनास्थळावर पोहचली आहेत. एनएसजी आणि एनआयएच्या पथकाने एफएसएलबरोबर सखोल चौकशी सुरू केली आहे. राजधानी दिल्लीमधील लाल किल्ल्याच्या जवळ हाय सेक्युरिटी झोन असलेल्या भागात एका कारमध्ये स्फोट झाल्याची माहिती समोर आली आहे. या स्फोटानंतर जवळपासच्या गाड्यांनी देखील पेट घेतल्याची माहिती मिळत आहे आहे. या स्फोटानंतर अग्निशमन दल आणि पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. दरम्यान या स्फोटात किमान ८ जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाल्याची महिती मिळत आहे. हे आकडे वाढण्याची शक्यता आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी संध्याकाळी ६.३० वाजण्याच्या सुमारास हा स्फोट झाला. दरम्यान अग्निशमन दलाच्या सुमारे सात गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या आहेत. स्फोटाचे नेमके कारण अद्याप कळू शकलेले नाही.दिल्ली अग्निशमन दलाने दिलेल्या माहितीनुसार, लाल किल्ला मेट्रो स्टेशनच्या गेट क्रमांक १ जवळ एका कारमध्ये स्फोट झाल्याची माहिती मिळाली. या स्फोटानंतर तीन ते चार अन्य वाहनांनाही आग लागली आणि त्यांचे नुकसान झाले. दरम्यान या स्फोटानंतर दिल्लीत हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. उत्तर प्रदेशात सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. एएनआयशी (ANI) बोलताना, उत्तर प्रदेशचे एडीजी कायदा व सुव्यवस्था अमिताभ यश यांनी सांगितले की, डीजीपींनी उत्तर प्रदेशातील सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांना संवेदनशील धार्मिक स्थळे, संवेदनशील जिल्हे आणि सीमावर्ती भागांमध्ये सुरक्षा वाढवण्याचे निर्देश दिले आहेत.

### उत्तर प्रदेशमध्ये हाय अलर्ट

सर्व सुरक्षा यंत्रणांनाही सतर्क करण्यात आले आहे. उत्तर प्रदेशातील सर्व जिल्ह्यांमध्ये पोलिसांना सतर्क राहण्याचे आदेश दिले आहेत. संवेदनशील भागांमध्ये गस्त आणि तपासणी वाढवण्याचे आदेश लखनऊ येथून जारी करण्यात आले आहेत.दिल्लीतील स्फोटानंतर माहिती देताना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले की, सुभाष मार्ग ट्राफिक सिग्नलवर आय २० ह्युंदाई गाडीत एक स्फोट झाला आहे. स्फोटामुळे जवळपासच्या गाड्या आणि रस्त्यावरून जाणारे लोक जखमी झाल्याची महिती आहे. प्राथमिक माहितीनुसार काही लोकांचा मृत्यूही झाला आहे.


# सोशल मीडियावर बनावट फोटो व्हायरल

## दिल्लीतील स्फोटाच्या घटनेनंतर सरकारकडून सावधानतेचा इशारा

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**दिल्लीमधील लाल किल्ला परिसरातील मेट्रो स्टेशनच्या गेट नंबर १ च्या बाहेर भीषण स्फोट झाल्याची घटना सोमवारी सायंकाळी घडली. या घटनेत किमान ८ जणांचा मृत्यू झाला असून इतर १२ जण जखमी झाले आहेत. या स्फोटानंतर दिल्लीत मोठी खळबळ उडाली. या स्फोटाच्या घटनेनंतर अग्निशमन दल आणि पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले असून पुढील चौकशी सुरू आहे.**

दरम्यान, दिल्ली स्फोटांशी संबंधित फोटो असल्याचे भासवून काही बनावट फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले असल्याची माहिती समोर आली आहे. या संदर्भात पीआयबी (प्रेस इन्फॉर्मेशन ब्युरो) फॅक्ट चेकने एक्सवर पोस्ट शेअर करत सावधानता बाळगण्याचा सल्ला दिला आहे. तसेच दिल्लीतील घटनेच्या संदर्भातील फोटो शेअर करण्यापूर्वी विश्वासार्ह किंवा अधिकृत स्त्रोतांच्या माध्यमातून माहिती पडताळून पाहण्याचं आवाहन केलं आहे.पीआयबीने एक्सवर काही पोस्ट शेअर केले असून त्यामध्ये काही सोशल मीडिया अंकाऊटवर बनावट फोटो वापरण्यात आल्याचा दावा पीआयबीने केला आहे. त्यामध्ये




२०२४ मध्ये लेबनॉनमधील बेरूत येथे झालेल्या इस्रायली हवाई हल्ल्यातील एक फोटो असल्याची पुष्टी केली आहे. त्यामुळे सरकारने नागरिकांना आवाहन केलं आहे की कोणताही फोटो किंवा व्हिडीओ शेअर करण्यापूर्वी त्याची सत्यता तपासावी.केंद्र सरकारने नागरिकांना कोणतेही फोटो किंवा व्हिडीओ शेअर करण्यापूर्वी ते पडताळून पाहण्याचं आवाहन केलं आहे. पीआयबी फॅक्ट-चेकिंग एजन्सीने म्हटलं आहे की अशा दिशाभूल करणाऱ्या मजकुराचा प्रसार केवळ अफवा पसरवत नाही तर सुरक्षा एजन्सींच्या तपासावरही परिणाम करतो. त्यामुळे केंद्र सरकारने सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर चुकीची माहिती पसरवणाऱ्या खात्यांवर लक्ष ठेवण्याचे निर्देश दिले असल्याची माहिती सांगितली आहे.दिल्लीमधील लाल किल्ला परिसरातील मेट्रो स्टेशनच्या गेट नंबर १ च्या बाहेर भीषण स्फोट झाल्याची घटना सोमवारी सायंकाळी घडली. या घटनेत किमान ८ जणांचा मृत्यू झाला असून इतर १२ जण जखमी झाले आहेत. या स्फोटानंतर दिल्लीत मोठी खळबळ उडाली. या स्फोटाच्या घटनेनंतर अग्निशमन दल आणि पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले.

### सरकारचं नागरिकांना आवाहन

सोशल मीडियावर व्हायरल झाले असल्याची माहिती समोर आली आहे. या संदर्भात पीआयबी (प्रेस इन्फॉर्मेशन ब्युरो) फॅक्ट चेकने एक्सवर पोस्ट शेअर करत सावधानता बाळगण्याचा सल्ला दिला आहे. तसेच दिल्लीतील घटनेच्या संदर्भातील फोटो शेअर करण्यापूर्वी विश्वासार्ह किंवा अधिकृत स्त्रोतांच्या माध्यमातून माहिती पडताळून पाहण्याचं आवाहन केलं आहे

# शाहरुख खानचा अतिश्रीमंतांच्या यादीत प्रथमच प्रवेश

बॉलीवूडचा बादशाह किंग खानच्या संपत्तीत मोठी वाढ झाली आहे. भारतातील सर्वात श्रीमंत व्यक्तींच्या यादीत त्याच्या नावाचा पहिल्यांदाच समावेश झाला आहे. याचबरोबर तो बॉलीवूडचा सर्वात श्रीमंत अभिनेता झाला आहे. भारतातील सर्वात श्रीमंत लोकांची यादी जाहीर करण्यात आली आहे, ज्यामध्ये किंग खानने हृतिक रोशन आणि अमिताभ बच्चन यांसारख्या अभिनेत्यांना मागे टाकत पहिला क्रमांक पटकावला.ताज्या अहवालानुसार, एका वर्षात शाहरुख खानच्या संपत्तीत तब्बल एक हजार कोटी रुपयांची वाढ झाली आहे. भारतातील सर्वात श्रीमंतांच्या यादीत गौतम अदानी पहिल्या क्रमांकावर आणि रिलायन्स इंडस्ट्रीजचे अध्यक्ष मुकेश अंबानी दुसऱ्या क्रमांकावर आहेत.हुरुन इंडिया रिच लिस्ट 2024 प्रसिद्ध करण्यात आली आहे, ज्यामध्ये शाहरुख खानने भारतातील सर्वात श्रीमंत अभिनेत्याच्या यादीत पहिला क्रमांक पटकावला आहे. या यादीनुसार, शाहरुखची एकूण संपत्ती ७,३०० कोटी रुपये आहे. तर, फोर्ब्स २०२३ च्या अहवालानुसार, मागच्या वर्षी त्याची एकूण संपत्ती ६,३०० कोटी रुपये होती. एका वर्षात शाहरुख खानच्या संपत्तीत एक हजार कोटी रुपयांची वाढ झाली आहे.शाहरुख खान व्यतिरिक्त अमिताभ बच्चन, जुही चावला, करण जोहर आणि हृतिक रोशन यांचीही नावे या यादीत आहेत. या स्टार्सनीही या यादीत पहिल्यांदाच स्थान मिळवलं आहे. यादीनुसार, अमिताभ बच्चन यांची संपत्ती १६०० कोटी, जुही चावलाची एकूण संपत्ती ४,६०० कोटी, हृतिक रोशनची संपत्ती दोन हजार कोटी आणि करण जोहरची एकूण संपत्ती १४०० कोटी आहे. या यादीत शाहरुख खाननंतर जुही चावलाचे नाव दुसऱ्या क्रमांकावर आहे, त्यानंतर हृतिक रोशन, अमिताभ बच्चन आणि शेवटी करण जोहरचे नाव आहे.शाहरुख खान जाहिराती व चित्रपटांमधून मोठी कमाई करतो. तसेच काही चित्रपटांच्या नफ्यामध्ये स्टार्सचा वाटा असतो. मिळाला असं म्हटलं जातं. त्यानुसार त्याने या चित्रपटातून २०० कोटी रुपये कमावले. तसेच किंग खानचे रेड चिलीज एंटरटेनमेंट हे प्रोडक्शन हाऊस आहे.

# रणवीर-दीपिका होणार शाहरुखचे शेजारी!

बॉलीवूड कलाकारांची लोकप्रियता पाहता, त्यांच्या एखाद्या नव्या चित्रपटाबाबत किंवा त्यांच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल चाहत्यांना कायमच उत्सुकता असते. बॉलीवूडमधील अशीच लोकप्रिय जोडी म्हणजे दीपिका पादुकोण आणि रणवीर सिंह. 'बाजीराव मस्तानी', 'पद्मावत' व 'रामलीला' यांसारख्या सुपरहिट चित्रपटांतून या जोडीनं प्रेक्षकांची मनं जिंकली. दीपिका आणि रणवीर या दोघांचाही फॅन फॉलोईंग मोठ्या प्रमाणात आहे. अशातच आता दीपिका आणि रणवीर त्यांच्या नव्या घराच्या निमित्तानं पुन्हा चर्चेत आले आहेत.दीपिका आणि रणवीर यांच्या नव्या घराच्या बातमीनं सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं. या दोघांनी मुंबईत चार मजल्यांचं घर खरेदी केलं होतं. सध्या त्या घराचं बांधकाम पूर्ण होत असल्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. वांद्रे येथील बॅण्डस्टॅण्ड हा मुंबईतील सर्वांत महागडा परिसर म्हणून ओळखला जातो. याच ठिकाणी सुपरस्टार शाहरुख खानचा 'मन्नत' बंगला आहे. दीपिका आणि रणवीर यांनी खरेदी केलेलं नवं घर शाहरुखच्या बंगल्यापासून काही अंतरावरच आहे. या घराची किंमत १०० कोटी असल्याचं सांगण्यात येत आहे. सध्या हे दोघं ही बाळाच्या स्वागतासाठी सिनेविश्वापासून लांब आहेत. या सप्टेंबर महिन्यात त्यांचं हे नवं घर सज्ज असणार आहे. त्याचबरोबर रायगडमध्येदेखील त्यांनी बंगला खरेदी केल्याचं म्हटलं आहे. दी इंडियन एक्स्प्रेसनं दिलेल्या वृत्तानुसार, अलिबागमध्ये या दोघांनी दोन वर्षांपूर्वीच २२ कोटींचा बंगला खरेदी केला होता.



# अफेअरच्या अफवांवर कुशाची प्रतिक्रिया

अभिनेत्री आणि कंटेंट क्रिएटर कुशा कपिला लवकरच शिल्पा शेट्टी स्टारर 'सुखी' आणि भूमी पेडणेकर स्टारर 'थँक यू फॉर कमिंग'मध्ये दिसणार आहे. घटस्फोटानंतर कुशा तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. अलीकडेच कुशाचे नाव अभिनेता अर्जुन कपूरसोबत जोडले गेले. आता कुशाने नुकतेच सांगितले आहे की ती ट्रोलिंगदरम्यान लोकांच्या या विचारसरणीला कशी सामोरे जात आहे. 'जर तुम्हाला असे वाटत असेल की लोकांनी तुमच्याबद्दल नेहमीच चांगले बोलले पाहिजे, तर याचा अर्थ तुम्ही लोकांच्या विचारांवर नियंत्रण ठेवू इच्छित आहात. लोक तुमच्याबद्दल काय बोलतात याची तुम्हाला नेहमी काळजी असते. अभिनेत्री म्हणाली की लोकांच्या विचारांवर नियंत्रण ठेवणे अशक्य आहे. विशेषतः जेव्हा एखादी व्यक्ती सार्वजनिक व्यक्ती असते. लोक तिच्याबद्दल काय विचार करतात आणि तिच्याकडून काय अपेक्षा करतात याबद्दल कुशा बोलली. ती याचा विचार करत नाही. ती म्हणाली- 'मला ती व्यक्ती व्हायचे नाही, जिला वयाच्या 50 व्या वर्षी असे वाटते की तिने आपले आयुष्य जगले नाही. तिला जे करायचे होते ते केले नाही. सर्वस्व दिले पण स्वतःचा विचार केला नाही. मला असं आयुष्य जगायचं नाही. काही दिवसांपूर्वी कुशाने अर्जुन कपूरसोबतच्या रिलेशनशिपच्या अफवांवर प्रतिक्रिया दिली होती. ती म्हणाली, 'मी दररोज माझ्याबद्दल इतके बाष्कळ वाचते की आता मला माझा औपचारिक परिचय देताना त्याबद्दल बोलायचे आहे. प्रत्येक वेळी जेव्हा मी माझ्याबद्दल काहीतरी वाचते तेव्हा मी आशा करते आणि प्रार्थना करते की माझ्या आईने हे सर्व वाचू नये. तिचे सामाजिक जीवन तसेही बिघडत चालले आहे.



# तैमूरने सामान्य जीवन जगावे : करीना कपूर

करीना कपूर आणि सैफ अली खान यांचा मोठा मुलगा तैमूर अली खान नेहमीच पापाराझींचा आवडता राहिला आहे. तो सर्वात जास्त कॅप्चर केला जाणारा स्टार किड देखील ठरला आहे. त्याच्यावर डॉलही बनवण्यात आल्या आहेत. आता एका मुलाखतीत करीना कपूरने बॉलिवूडच्या प्रसिद्ध पापाराझी ट्रेंडबद्दल सांगितले. पालक या नात्याने त्यांनी आपल्या मुलांचे चेहरे फोटोग्राफर्सपासून का लपवले नाहीत हेही त्यांनी सांगितले. एक्सप्रेस अड्डाला दिलेल्या मुलाखतीत करीना म्हणाली, 'ही प्रक्रिया खूपच कठीण होती. आम्ही आमच्या मुलांचे चेहरे छायाचित्रकारांपासून कधीही लपवले नाही कारण त्यामुळे त्यांच्या मनात अनेक प्रश्न निर्माण होतात. मी सैफशी याबद्दल चर्चा केली होती आणि त्यानेही सुचवले होते की आपण याला एकत्रितपणे सामोरे जावे. करीना म्हणाली, 'आम्हाला नेहमी वाटायचे की, याला असेच सोडणे चांगले. त्यांना लपविल्याने त्यांच्यावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. असे केल्याने तो लाजाळू झाला असता की त्याच्यावर आणखी काही परिणाम झाला असता कुणास ठाऊक. मी लहान असताना, मला कुठेही बाहेर जायला आवडत नसे कारण माझ्या पालकांनी मला लपवून ठेवले होते. तैमूरने सामान्य जीवन जगावे अशी माझी इच्छा होती. यावेळी करीनाने सांगितले की, तैमूरला वयाच्या 5 व्या वर्षापासून त्याचे फोटो काढले जात असल्याचे लक्षात येऊ लागले होते. अभिनेत्री म्हणाली, 'तो खूप हुशार आहे कारण त्याला माहित आहे की आम्ही कलाकार आहोत. जेव्हा मी त्याला सांगितले की आम्ही चित्रपटांमध्ये दिसतो, तेव्हा तो माझ्याकडे वळला आणि मला विचारले की मी फेमस नाही, मग ते माझे फोटो का काढतात? मात्र, आता तैमूरला याची सवय झाली आहे.

## कोणाला उद्देशून केलं वक्तव्य? गावस्करांनी वर्ल्ड चॅम्पियन महिला संघाला दिला इशारा

# मिळणारा गौरव टिकवणंही तितकंच अवघड!

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय महिला संघाने पहिल्यांदाच विश्वचषकाचं जेतेपद पटकावलं. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली भारतीय महिला क्रिकेट संघाने दक्षिण आफ्रिका महिला संघाचा पराभव करत पहिल्यांदाच एकदिवसीय विश्वचषक जिंकण्याचा मान मिळवला. भारतीय महिला संघाच्या या कामगिरीनंतर संघावर कौतुकांचा पुरस्कारांचा वर्षाव होत आहे आणि खेळाडूंच्या ब्रँड व्हॅल्यूमध्येही लक्षणीय वाढ झाली आहे. यादरम्यान गावस्करांनी महिला संघातील खेळाडूंना एक मोठा सल्ला दिला.**

## महिला वर्ल्ड चॅम्पियन संघाला दिला इशारा



ऐतिहासिक विजयानंतर संपूर्ण देशात आनंदाचा जल्लोष उसळला. वर्ल्ड चॅम्पियन महिला संघाच्या यशाचा गौरव करण्यासाठी बीसीसीआयने ५१ कोटी रुपयांच्या रोख पारितोषिकाची घोषणा केली, ज्यात आयसीसीकडून मिळालेल्या ४० कोटी रुपयांच्या पुरस्काराचीही भर होती. याशिवाय, विविध राज्य सरकारांनी ऋचा घोष, हरमनप्रीत कौर, स्मृती मानधाना आणि हरलीन देओल यांसारख्या खेळाडूंना स्वतंत्र सन्मान आणि पुरस्कार जाहीर केले आहेत. मात्र, दिग्गज सुनील गावस्कर यांनी खेळाडूंना इशारा दिला आहे की, 'फार अपेक्षा ठेवू नका,' कारण अशा क्षणांनंतर मिळणारा गौरव टिकवणंही तितकंच अवघड असतं.गावस्करांनी मिड-डेमधील त्यांच्या स्तंभलेखात महिला संघाला सांगितलंय, "मुलींसाठी फक्त एक इशारा. जर तुम्हाला वचनं दिलेली काही बक्षिसं मिळाली नाहीत तर निराश होऊ नका. भारतातील जाहिरातदार किंवा ब्रँड पटकन शर्यतीत सामील होतात आणि विजेत्यांच्या खांद्यावर मोफत प्रसिद्धी मिळवण्याचा प्रयत्न करतात. जर तुम्ही संघाचे अभिनंदन करणाऱ्या पूर्ण पानाच्या जाहिराती आणि होर्डिंग्जवर एक नजर टाकली तर हे स्पष्ट होतं की ते फक्त त्यांच्या ब्रँडचा किंवा स्वतःचा प्रचार करण्याचा प्रयत्न करत आहेत,पण भारतीय क्रिकेटसाठी एवढी मोठी कामगिरी करणाऱ्यांना काहीच देत नाहीत.गावस्कर यांनी वैयक्तिक अनुभवाच्या आधारे हा इशारा दिला. १९८३ मध्ये भारतीय संघाने पहिला एकदिवसीय विश्वचषक जिंकल्यानंतर, त्यांना अनेक आश्वासने देण्यात आली होती जी आजपर्यंत पूर्ण झालेली नाहीत. याबाबत पुढे बोलताना सुनील गावस्कर म्हणाले, "१९८३ मधील वर्ल्डकप विजेत्या संघाकरता त्या वेळी बऱ्याच आश्वासनांचा पाऊस पडला होता आणि माध्यमांमध्येही प्रचंड गाजावाजा झाला होता. पण त्यापैकी जवळजवळ काहीच प्रत्यक्षात आलं नाही."माध्यमांना त्यासाठी दोष देता येणार नाही, कारण ती लोकं फक्त झालेल्या मोठमोठ्या घोषणा प्रसिद्ध करत होती, त्यांना हेही कळलं नाही की त्यांचाही वापर हे असे लोक स्वतःच्या प्रसिद्धीसाठी करत आहेत. म्हणूनच, मुलींनो, जर हे निर्लज्ज लोक तुमच्या विजयाचा वापर स्वतःचा फायदा करून घेण्यासाठी करत असतील, तर त्याबद्दल फार काळजी करू नका," असा सल्ला गावस्करांनी दिला.भारतीय महिला संघाने पहिल्यांदाच विश्वचषकाचं जेतेपद पटकावलं. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली भारतीय महिला क्रिकेट संघाने दक्षिण आफ्रिका महिला संघाचा पराभव करत पहिल्यांदाच एकदिवसीय विश्वचषक जिंकण्याचा मान मिळवला. भारतीय महिला संघाच्या या कामगिरीनंतर संघावर कौतुकांचा पुरस्कारांचा वर्षाव होत आहे आणि खेळाडूंच्या ब्रँड व्हॅल्यूमध्येही लक्षणीय वाढ झाली आहे. यादरम्यान गावस्करांनी महिला संघातील खेळाडूंना एक मोठा सल्ला दिला. वर्ल्ड चॅम्पियन महिला संघाच्या यशाचा गौरव करण्यासाठी बीसीसीआयने ५१ कोटी रुपयांच्या रोख पारितोषिकाची घोषणा केली, ज्यात आयसीसीकडून मिळालेल्या ४० कोटी रुपयांच्या पुरस्काराचीही भर होती. याशिवाय, विविध राज्य सरकारांनी ऋचा घोष, हरमनप्रीत कौर, स्मृती मानधाना आणि हरलीन देओल यांसारख्या खेळाडूंना स्वतंत्र सन्मान आणि पुरस्कार जाहीर केले आहेत. मात्र, दिग्गज सुनील गावस्कर यांनी खेळाडूंना इशारा दिला आहे की, 'फार अपेक्षा ठेवू नका,' कारण अशा क्षणांनंतर मिळणारा गौरव टिकवणंही तितकंच अवघड असतं.गावस्करांनी मिड-डेमधील त्यांच्या स्तंभलेखात महिला संघाला सांगितलंय, "मुलींसाठी फक्त एक इशारा. जर तुम्हाला वचनं दिलेली काही बक्षिसं मिळाली नाहीत तर निराश होऊ नका. भारतातील जाहिरातदार किंवा ब्रँड पटकन शर्यतीत सामील होतात आणि विजेत्यांच्या खांद्यावर मोफत प्रसिद्धी मिळवण्याचा प्रयत्न करतात. जर तुम्ही संघाचे अभिनंदन करणाऱ्या पूर्ण पानाच्या जाहिराती आणि होर्डिंग्जवर एक नजर टाकली तर हे स्पष्ट होतं.

### देशात आनंदाचा जल्लोष

भारतीय क्रिकेटसाठी एवढी मोठी कामगिरी करणाऱ्यांना काहीच देत नाहीत.गावस्कर यांनी वैयक्तिक अनुभवाच्या आधारे हा इशारा दिला. १९८३ मध्ये भारतीय संघाने पहिला एकदिवसीय विश्वचषक जिंकल्यानंतर, त्यांना अनेक आश्वासने देण्यात आली होती जी आजपर्यंत पूर्ण झालेली नाहीत. याबाबत पुढे बोलताना सुनील गावस्कर म्हणाले, "१९८३ मधील वर्ल्डकप विजेत्या संघाकरता त्या वेळी बऱ्याच आश्वासनांचा पाऊस पडला होता.

---

# तो एखाद वेळेस मार खाईल, रडेल पण

## युवराज सिंगने अभिषेक शर्माबाबत केला मोठा खुलासा

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारताच्या टी-२० संघाचा सलामीवीर अभिषेक शर्मा २०२५ मध्ये तुफान फॉर्मात आहे. नुकत्याच झालेल्या ऑस्ट्रेलियाविरूद्ध टी-२० मालिकेत त्याने सर्वात कमी चेंडूत एक हजार धावा पूर्ण करण्याचा वर्ल्ड रेकॉर्ड केला आहे. याचबरोबर त्याने मालिकेत १६३ सर्वाधिक युवराज सिंग व अभिषेकचा एक व्हीडिओ सध्या व्हायरल होत आहे.**



अभिषेक शर्माने भारताचा माजी खेळाडू युवराज सिंगकडे क्रिकेटचे धडे गिरवले आहेत. युवराजने त्याला ट्रेनिंग देत आंतरराष्ट्रीय क्रिकेटसाठी तयार केलं आहे. युवराजबरोबर सराव करतानाचे अभिषेकचे काही व्हीडिओही आपण पाहिले आहेत. युवराज सिंग अभिषेकला फार सुरूवातीपासून ओळखतो आणि यासह त्याने अभिषेकचं एक सीक्रेट सांगितलं आहे. युवराजने अभिषेक शर्माबाबत एक मोठा खुलासा केला आहे. तो म्हणाला की अभिषेककडून कोणीही काहीही घेऊ शकतो, पण त्याच्याकडून बॅट मात्र कोणीच घेऊ शकत नाही. युवराज म्हणाला अभिषेक त्याच्या बॅटची खूप काळजी घेतो आणि सतत त्याच्याकडे किती बॅट आहेत हे मोजत असतो.युवराज आणि अभिषेक यांच्या एकत्र मुलाखतीचा एक व्हीडिओ सध्या व्हायरल होत आहे. युवराज या मुलाखतीमध्ये म्हणतोय, "तुम्ही अभिषेक शर्माकडून काहीही घेऊ शकता, पण त्याच्याकडून त्याची बॅट कोणीच घेऊ शकणार नाही. तो एखाद वेळेस लढेल, मार खाईल, रडेल पण आपली बॅट देणार नाही. त्याच्याकडे दहा बॅट असतील तरी तो म्हणेल, माझ्याकडे फक्त दोनच बॅट आहेत, दोन किटबॅगमध्ये असतात.

### अभिषेकने एक हजार धावा पूर्ण

माझ्या बऱ्याच बॅट घेऊन गेला, मी कधी नको नाही म्हटलं त्याला पण स्वतःची बॅट तो कधीच देत नाही."अभिषेक शर्माने ऑस्ट्रेलियाविरूद्ध टी-२० मालिकेत चांगली कामगिरी केली. २५ वर्षीय अभिषेक शर्मा टी-२० मध्ये सर्वात कमी चेंडूत जलद एक हजार धावा करणारा पहिला खेळाडू ठरला. अभिषेकने ५२८ चेंडूत एक हजार धावा पूर्ण करत विश्वविक्रम आपल्या नावे केला.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज

ePaper

epaper.mahaenews.com

| मंगळवार |

| दि. 11 नोव्हेंबर 2025 |

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## मिशन- PCMC : राष्ट्रवादी काँग्रेस (अ.प.) कडून शहरात

# “जुन्या कढीला नव्याने उकळी”!

### किरकोळ प्रवेशाचे “फार्स” दाखवून उपमुख्यमंत्री अजित पवार यांची मर्जी सांभाळण्याचा प्रयत्न

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



**पिंपरी-चिंचवड शहरातील एकेकाळी सत्ताधारी आणि बलाढ्य असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटावर आता किरकोळ प्रवेशांचे ‘फार्स’ करण्याची वेळ आली आहे. किंबहुना, माजी नगरसेवक जितेंद्र ननावरे आणि अनंत कोऱ्हाळे यांचे प्रवेश घेतले आणि काहीतरी ‘ॲक्टिव्हीटी’ सुरू आहेत, असा दिखावा करण्याचा प्रयत्न केला. किंबहुना, महापालिका आणि शहराच्या राजकारणाचा प्रदीर्घ अनुभव असलेले शहराध्यक्ष योगेश बहल यांनी अक्षरश: “जुन्या कढीला नव्याने उकळी” देण्याची भूमिका घेतली.**

महायुतीमध्ये भाजपा सोबत घरोबा असताना राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी मुंबईत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीमध्ये झालेल्या आढावा बैठकीत “स्वबळाचा नारा” दिला. स्वबळावर निवडणूक लढण्याची तयारी ठेवा... असे आदेश अजितदादांनी दिले. त्यानंतर शहराध्यक्ष योगेश बहल यांनी आपली यंत्रणा कामाला लावली.

पहिल्या झटक्यात आपल्या प्रभगातील सहकारी व माजी नगसेवक जितेंद्र ननावरे यांची ‘घरवापरी’ केली. त्यानंतर चिंचवडमधील माजी नगरसेवक अनंत कोऱ्हाळे यांचा प्रवेश घेण्यात आला. सदरचे दोन्ही प्रवेश पुण्यात उरकण्यात आले.

पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपा विरुद्ध राष्ट्रवादी अजित पवार गट अशी निवडणूक होईल, असे जवळपास निश्चित झाले आहे. भाजपाने निवडणूक प्रमुख, प्रभारी अशी नियुक्ती करुन कामाला सुरूवात केली आहे. किंबहुना, आरक्षण सोडत झाल्यानंतर पहिल्या टप्प्यातील जाहीर प्रवेशांचा कार्यक्रम जोरदारपणे घेण्याची तयारी सुरू केली आहे. मात्र, भाजपाला तोडीस तोड आव्हान देण्याची क्षमता असलेल्या राष्ट्रवादीकडे नियोजनाचा पूर्णत: अभाव आणि उदासिनता दिसून येत आहे.

#### ननावरे यांच्या प्रवेशाने आमदार बनसोडे यांची नाराजी?

भाजपाकडून तिकीट न मिळालेल्या उमेदवारांच्या भरोशावर राष्ट्रवादीची मदार आहे. किंबहुना, आढावा बैठका किंवा नियोजनाचा अभाव प्रचंड आहे. पिंपरी विधानसभा निवडणुकीत जितेंद्र ननावरे यांनी आमदार आण्णा बनसोडे यांच्या विरोधात काम केले आहे. बनसोडे यांच्या पराभवाची शपथ त्यांनी सार्वजनिकरित्या घेतली होती. तत्पूर्वी, 2017 मध्ये भाजपात प्रवेश केला आणि स्वत:च्या जनसंपर्क कार्यालयातील उपमुख्यमंत्री अजित पवार यांची प्रतिमा हटवली होती. विशेष म्हणजे, योगेश बहल यांच्यावरही टीका केली होती. 2019 मध्ये लोकसभा निवडणुकीत पार्थ पवार उभा होते. त्यावेळी पार्थ पवार यांच्याविरोधात जाहीर प्रचार केला होता. शहराध्यक्ष बहल यांनी ननावरे यांचा प्रवेश करुन घेणे म्हणजे “स्वत:चा प्रभाग सुरक्षित करण्यासाठी पक्ष बंडखोरांच्या दावणीला बांधणे” असा प्रकार आहे, अशी टीका पक्षांतर्गत होवू लागली आहे. विशेष म्हणजे, ननावरे यांच्या प्रवेशामुळे आमदार बनसोडे समर्थकांत नाराजी आहे, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.

#### अनंत कोऱ्हाळेंमुळे खरंच राष्ट्रवादी ला फायदा होईल का?

माजी मंत्री स्व. प्रा. रामकृष्ण मोरे यांचे निकटवर्ती तत्कालीन काँग्रेसचे शहराध्यक्ष हनुमंत गावडे यांचे 1997 मध्ये अनंत कोऱ्हाळे समर्थक होते. त्यांनी काँग्रेसमधून शिवसेनेत प्रवेश केला. शिवसेनेकडून तिकीट मिळाले नाही. त्यामुळे त्यांनी मनसेत प्रवेश केला. 2012 च्या निवडणुकीत त्यांनी मनसेच्या तिकीटावर निवडून आले. 2014 मध्ये विधानसभा निवडणुकीत त्यांनी मनसेकडून चिंचवड विधानसभा लढवली. या निवडणुकीत दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्याविरोधात ‘डिपॉझिट जप्त’ झाले. त्यांचा सुमारे 1 लाख 20 हजार मतांनी पराभव झाला होता. 2017 च्या महापालिका निवडणुकीत त्यांनी पुन्हा शिवसेनेत प्रवेश केला. या निवडणुकीतही त्यांचा पराभव झाला. शिवसेना फुटली. त्यानंतर कोऱ्हाळे यांनी शिवसेना उबाठा सोबत राहणे पसंत केले. 2019 मध्ये विधानसभा निवडणुकीत त्यांनी शिवसेना उबाठा गटात असताना तत्कालीन अपक्ष उमेदवार राहुल कलाटे यांचा जाहीर प्रचार केला. 2024 च्या विधानसभा निवडणुकीत भाऊसाहेब भोईर यांचा जाहीर प्रचार केला. भोईर यांना संपूर्ण विधानसभा मतदार संघातून अवघी 4 हजार मते पडली होती. कोऱ्हाळे ज्या प्रभागातून प्रतिनिधीत्व करतात त्या ठिकाणी भोईर यांना 1 हजारपेक्षा कमी मते पडली आहेत. आता महापालिका निवडणुकीच्या निमित्ताने कोऱ्हाळे यांनी राष्ट्रवादी अजित पवार गटात प्रवेश केला. या जाहीर प्रवेशाच्यावेळी शहराध्यक्ष योगेश बहल, माजी विरोधी पक्षनेते नाना काटे आणि अजित गव्हाणे उपस्थित होते. मात्र, राष्ट्रवादीतील मंडळी “चिंचवडमध्ये खिंडार” असे वातावरण निर्माण करीत आहेत. खरंच अनंत कोऱ्हाळे यांचा राष्ट्रवादीला फायदा होईल का? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित झाला आहे.

## ‘रिअल लाईफ रिअल पीपल’तर्फे मोफत नेत्रतपासणी शिबिर

### भाजयुमो शहराध्यक्ष दिनेश यादव यांच्या वाढदिवसानिमित्त वृद्धाश्रमात सामाजिक उपक्रम

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय जनता युवा मोर्चा, पिंपरी चिंचवड शहर यांच्या वतीने शहराध्यक्ष दिनेश यादव यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक जाणिवेतून “रिअल लाईफ रिअल पीपल” या उपक्रमांतर्गत सावली निवारा केंद्र, वृद्धाश्रम येथे मोफत नेत्र तपासणी व मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले.**



भारतीय जनता युवा मोर्चा, पिंपरी चिंचवड शहर यांच्या वतीने शहराध्यक्ष दिनेश यादव यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक जाणिवेतून “रिअल लाईफ रिअल पीपल” या उपक्रमांतर्गत सावली निवारा केंद्र, वृद्धाश्रम येथे मोफत नेत्र तपासणी व मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिरात वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांची नेत्र तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान मोतीबिंदूची शस्त्रक्रिया आवश्यक असलेल्या रुग्णांची ओळख करून त्यांच्यावर विनामूल्य शस्त्रक्रिया करण्यात आली. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून समाजकल्याण विभागाचे मा. उपायुक्त संजय कदम तसेच भाजयुमो शहराचे सचिव अजित कुलथे उपस्थित होते. या प्रसंगी बोलताना त्यांनी म्हटले की, “अशा सामाजिक उपक्रमांमुळे तरुणांमध्ये सेवा वृत्ती रुजते आणि समाजाशी जोडलेपण अधिक दृढ होते.” या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री. सुमित श्रीकांत घाटे (मंडल अध्यक्ष, भाजयुमो पिंपरी-दापोडी व अध्यक्ष, हिंदू गर्जना प्रतिष्ठान), श्री. राहुल सदाशिव खाडे (सरचिटणीस, भाजयुमो पिंपरी चिंचवड शहर) आणि सतीश नारायण नागरगोजे यांनी उत्कृष्ट नियोजन करून शिबिर यशस्वीरीत्या पार पाडले.

### भाजपा निवडणूक प्रमुखपदाची जबाबदारी मिळताच

# आमदार महेश लांडगे “ऑनफिल्ड”!

## आळंदी, राजगुरूनगर, चाकण, मंचर, जुन्नर, शिरूर नगर परिषदांसाठी बैठकांचा सपाटा

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणे । विशेष प्रतिनिधी । आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या निमित्ताने भारतीय जनता पार्टीने जिल्हा निवडणूक प्रभारी आणि प्रमुख यांची नियुक्ती केली. पुणे जिल्ह्यात भाजपा संघटनात्मक संरचनेप्रमाणे उत्तर पुणे जिल्हा (मावळ)मध्ये ‘जिल्हा निवडणूक प्रमुख’ म्हणून आमदार महेश लांडगे यांच्याकडे जबाबदारी सोपवण्यात आली. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी आमदार लांडगे यांनी आढावा बैठकांचा सपाटा लावला आहे.**



भारतीय जनता पार्टीच्या संघटनात्मक रचनेनुसार, पुणे जिल्ह्याचे विभाजन पुणे शहर, पिंपरी-चिंचवड शहर, उत्तर पुणे आणि दक्षिण पुणे चार संघटनात्मक जिल्ह्यांत केले जाते. उत्तर पुणे जिल्ह्यात आंबेगाव, जुन्नर, खेड, मावळ, शिरुर, हवेली या सहा तालुक्यांचा समावेश आहे. या तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका होणार आहेत. यामध्ये 7- नगरपरिषदा आहेत. ज्यामध्ये लोणावळा, तळेगाव, चाकण, राजगुरूनगर शिरुर, आळंदी, जुन्नर या नगरपरिषदांचा समावेश आहे. 2- नगर पंचायती आहेत. यामध्ये मंचर आणि वडगावचा समावेश आहे. तसेच, 6- पंचायत समिती आहेत. यामध्ये आंबेगाव, जुन्नर, खेड, मावळ, शिरुर, हवेली यांचा समावेश आहे.

विशेष म्हणजे, 6- तालुके उत्तर पुणे जिल्ह्यात येतात. त्यामध्ये आंबेगाव, जुन्नर, खेड, मावळ, शिरुर, हवेलीचा समावेश आहे. 41- जिल्हा परिषदचे गट आहेत. त्यामध्ये आंबेगाव – 5, जुन्नर- 8 , खेड-8 , मावळ-5, शिरुर-8, हवेली- 6/7 अशा गटांचा समावेश आहे. तसेच, 76 पंचायत समिती गण संख्या आहे.

आमदार लांडगे म्हणाले की, भाजपाचा प्रत्येक सदस्य, कार्यकर्ता आणि पदाधिकारी यांनी थेट नागरिकांपर्यंत पोहोचून भाजपाचा ‘‘विकासाभिमूख हिंदुत्व’’ हा विचार घराघरात पोहोचवावा. ग्रामीण आणि नागरी अशा दोन्ही पट्ट्यांमध्ये विकासाची गती अधिक वाढविणे, हेच आपले पुढील लक्ष्य आहे. त्यासाठी भाजपाला विजयश्री खेचून आणण्यासाठी प्रत्येकाने जोमाने कामाला लागावे, असे आवाहन आढावा बैठकीमध्ये केले आहे. “ही निवडणूक केवळ एखाद्या उमेदवाराची नाही, तर प्रत्येक कार्यकर्त्याची जबाबदारी आणि योगदानाचे प्रतिबिंब आहे” ही भूमिका अधोरेखित केली. भाजपाचा विचार प्रत्येक घरापर्यंत पोहोचवूया आणि “सबल भारत, सक्षम महाराष्ट्र अन् समृद्ध पुणे जिल्हा” या ध्येयाने पुढे जाऊया!...

### अनंत कोऱ्हाळेंमुळे खरंच राष्ट्रवादी ला फायदा होईल का?

माजी मंत्री स्व. प्रा. रामकृष्ण मोरे यांचे निकटवर्ती तत्कालीन कॉंग्रेसचे शहराध्यक्ष हनुमंत गावडे यांचे 1997 मध्ये अनंत कोऱ्हाळे समर्थक होते. त्यांनी कॉंग्रेसमधून शिवसेनेत प्रवेश केला. शिवसेनेकडून तिकीट मिळाले नाही. त्यामुळे त्यांनी मनसेत प्रवेश केला. 2012 च्या निवडणुकीत त्यांनी मनसेच्या तिकीटावर निवडून आले. 2014 मध्ये विधानसभा निवडणुकीत त्यांनी मनसेकडून चिंचवड विधानसभा लढवली. या निवडणुकीत दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्याविरोधात ‘डिपॉझिट जप्त’ झाले. त्यांचा सुमारे 1 लाख 20 हजार मतांनी पराभव झाला होता. 2017 च्या महापालिका निवडणुकीत त्यांनी पुन्हा शिवसेनेत प्रवेश केला. या निवडणुकीतही त्यांचा पराभव झाला. शिवसेना फुटली. त्यानंतर कोऱ्हाळे यांनी शिवसेना उबाठा सोबत राहणे पसंत केले. 2019 मध्ये विधानसभा निवडणुकीत त्यांनी शिवसेना उबाठा गटात असताना तत्कालीन अपक्ष उमेदवार राहुल कलाटे यांचा जाहीर प्रचार केला. 2024 च्या विधानसभा निवडणुकीत भाऊसाहेब भोईर यांचा जाहीर प्रचार केला. भोईर यांना संपूर्ण विधानसभा मतदार संघातून अवघी 4 हजार मते पडली होती. कोऱ्हाळे ज्या प्रभागातून प्रतिनिधीत्व करतात त्या ठिकाणी भोईर यांना 1 हजारपेक्षा कमी मते पडली आहेत. आता महापालिका निवडणुकीच्या निमित्ताने कोऱ्हाळे यांनी राष्ट्रवादी अजित पवार गटात प्रवेश केला. या जाहीर प्रवेशाच्यावेळी शहराध्यक्ष योगेश बहल, माजी विरोधी पक्षनेते नाना काटे आणि अजित गव्हाणे उपस्थित होते. मात्र, राष्ट्रवादीतील मंडळी “चिंचवडमध्ये खिंडार” असे वातावरण निर्माण करीत आहेत. खरंच अनंत कोऱ्हाळे यांचा राष्ट्रवादीला फायदा होईल का? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित झाला आहे.

---

### पुनावळे, ताथवडे, वाकड परिसरात ‘उत्सव आनंदाचा-खेळ पैठणीचा!

## भाजपाचे राहुल काटे यांचा पुढाकार: महिलांच्या कलेला व गुणांना मिळाले व्यासपीठ

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**महिला भगिनींच्या कला, गुण आणि सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी भाजपाचे श्री. राहुल काटे यांच्या पुढाकाराने ‘उत्सव आनंदाचा – खेळ पैठणीचा!’ हा उपक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास परिसरातील महिलांचा तसेच नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.**




कार्यक्रमाची सुरुवात जेष्ठ नागरिकांच्या शुभहस्ते प्रतिमा पूजनाने झाली. प्रमुख पाहुण्या म्हणून प्रसिद्ध अभिनेत्री पल्लवी वैद्य (रेणुका फेम – लक्ष्मी सिरियल) यांनी उपस्थित राहून महिलांचे मनोबल वाढवले. या स्पर्धेत विजेत्यांना टीव्ही, फ्रिज, गॅस शेगडी, मिक्सर, इलेक्ट्रिक शेगडी अशी आकर्षक बक्षिसे देण्यात आली. महिलांनी उत्साहात सहभाग घेत विविध कलागुणांचे सादरीकरण केले.

कार्यक्रमाचे आयोजन चिंचवड विधानसभा मतदार संघाचे आमदार श्री. शंकर जगताप यांचे निष्ठावंत सहकारी राहुल काटे यांच्या पुढाकाराने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे पिंपरी-चिंचवड शहर जिल्हा भाजपा अध्यक्ष शत्रुघ्न (बाप्पू) काटे यांच्या शुभहस्ते कर्तृत्ववान महिलांचा सन्मान आणि बक्षीस वितरण सोहळा पार पडला.

या प्रसंगी कृषिनिष्ठ पुरस्कार विजेते सुनील ढवळे, भाजपा शहर वरिष्ठ उपाध्यक्ष काळूराम बारणे, भाजपा शहर उपाध्यक्ष राम वाकडकर, मंडल अध्यक्ष भाजपा प्रसाद कस्पटे, RPI शहराध्यक्ष कुणाल वाव्हळकर, युवा नेते चेतन पवार, विजय दगडे, श्रीराम मंदिर पुनावळेचे विश्वस्त ज्ञानदेव काटे, विजय दर्शले, शुभम भुजबळ, नितीन दर्शले, अमित दर्शले, किशोर चित्राव, अशोक कटयारे तसेच प्रभाग क्र. २५ मधील भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध सोसायट्यांचे चेअरमन, सदस्य व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे उत्कृष्ट आयोजन करून महिलांना प्रोत्साहन देणारे राहुल काटे यांच्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत आहे.

> “महिलांचे सामर्थ्य ओळखून त्यांना संधी दिली, तर प्रत्येक समाज उज्वल भविष्याकडे वाटचाल करतो.“हा खेळ केवळ पैठणीचा नाही, तर महिलांच्या आत्मविश्वासाचा, कलेचा आणि आनंदाचा उत्सव आहे.सेवा आणि सन्मान यांची सांगड घातली, की समाजातील प्रत्येक घर आनंदाने उजळून निघते.”
>
> **–राहुल काटे,** सामाजिक कार्यकर्ते, भाजपा.

## शालेय राष्ट्रीय वुशू स्पर्धेत

# कु. पार्थ तांबेरे यांचा कांस्यपदकाने गौरव!

## शिक्षण विश्व: राजमाता जिजाऊ शिक्षण संस्थेचा मान व अभिमान अधिक वाढला

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**श्रीनगर (जम्मू-काश्मीर) येथे नुकत्याच पार पडलेल्या शालेय राष्ट्रीय वुशू क्रीडा स्पर्धेत भोसरी येथील राजमाता जिजाऊ कनिष्ठ महाविद्यालय, लांडेवाडीचा विद्यार्थी कु. पार्थ तांबेरे (इ. ११ वी विज्ञान) याने उल्लेखनीय कामगिरी करत १७ वर्षांखालील ७५ किलो वजन गटात कांस्यपदक पटकावले..**



गतवर्षीही पार्थने या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत पदकाची कमाई करून आपले कौशल्य सिद्ध केले होते. या वर्षीही त्याने उत्कृष्ट खेळ कौशल्य आणि चिकाटीच्या जोरावर पुन्हा एकदा राष्ट्रीय पातळीवर भोसरीचे नाव उज्ज्वल केले. पार्थला या यशासाठी कनिष्ठ महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. गोपीचंद करंडे यांनी विशेष मार्गदर्शन केले.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष व भोसरीचे प्रथम आमदार मा. श्री. विलासराव लांडे साहेब यांनी पार्थचे कौतुक करत त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

तसेच संस्थेचे खजिनदार व पिं.चिं.मनपा स्थायी समितीचे माजी अध्यक्ष श्री. अजितभाऊ गव्हाणे, संस्थेचे सचिव श्री. सुधीरभाऊ मुंगसे, नगरसेवक व विश्वस्त विक्रमदादा लांडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के.जी. कानडे, उपप्राचार्य प्रा. किरण चौधरी, कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. नेहा बोरसे, रजिस्ट्रार सौ. अश्विनी चव्हाण, तसेच विभागप्रमुख प्रा. राजू हजारे, प्रा. योगिता बारवकर, प्रा. संगिता गवस, प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारीवृंद यांनी पार्थचे मनःपूर्वक

या यशामुळे राजमाता जिजाऊ शिक्षण संस्थेचा मान व अभिमान अधिक वाढला असून, पार्थ तांबेरे भविष्यात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे नाव उज्ज्वल करील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

> “ कु. पार्थ तांबेरे याने दाखवलेले कौशल्य, मेहनत आणि जिद्द खरोखरच प्रेरणादायी आहे. अशा तरुण खेळाडूंमुळे आपल्या भोसरीचा आणि संस्थेचा अभिमान वाढतो. आमच्या संस्थेमार्फत अशा गुणवंत विद्यार्थ्यांना सर्वतोपरी मदत, प्रोत्साहन आणि प्रशिक्षणाची उत्तम सुविधा देण्याचा आम्ही नक्की प्रयत्न करू. भविष्यात पार्थसारख्या खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय पातळीवरही भारताचा तिरंगा फडकवावा, हीच अपेक्षा आहे.
>
> **--विलास लांडे,** अध्यक्ष, राजमाता जिजाऊ शिक्षण संस्था.

---

## कलांजली नृत्य अकॅडमीच्या चार प्रतिभावान विद्यार्थिनींनी मारली बाजी

## भरतनाट्यम अरंगेत्रम सोहळ्यात वेदिका, अनन्या, नित्या, जुही यांचा मनमोहक नृत्याविष्कार

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**कलांजली नृत्य अकॅडमीच्या चार प्रतिभावान विद्यार्थिनी — वेदिका सुर्वे, अनन्या रोहिणकर, नित्या पंडित आणि जुही वायकोले — यांचा भरतनाट्यम अरंगेत्रम हा नृत्यप्रयोग पुण्यातील सिंबायोसिस कॉलेज, विमाननगर येथे शनिवारी दिमाखात पार पडला.**



गेल्या १४ वर्षांपासून या चौघी विद्यार्थिनींनी आपल्या गुरु सौ. गौरी देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली भरतनाट्यमचे शास्त्रीय प्रशिक्षण घेतले आहे. दीर्घ साधना, नृत्यावरील निष्ठा आणि सातत्यपूर्ण परिश्रम यांचे फलस्वरूप म्हणून साकारलेला हा अरंगेत्रम सोहळा त्यांच्या नृत्य प्रवासातील एक मैलाचा दगड ठरला. 'अरंगेत्रम' हा भरतनाट्यम कलाविश्वातील विद्यार्थिनीच्या नृत्यजीवनातील दीक्षा समारंभ मानला जातो — ज्यामध्ये ती पहिल्यांदाच सार्वजनिकरित्या एकल नृत्यप्रयोग सादर करते. या चारही नर्तिकांनी आपल्या भावपूर्ण मुद्राभिनय, लयबद्ध पादक्रम आणि कलात्मक अभिव्यक्तीद्वारे प्रेक्षकांची मनं जिंकली.

सुंदर पारंपरिक वेशभूषा, सुरेल शास्त्रीय संगीत आणि सुसंवादी नृत्यरचना यांनी कार्यक्रमाला वेगळीच झळाळी दिली. सुमारे ४०० प्रेक्षकांनी या कलासोहळ्याला हजेरी लावली आणि प्रत्येक सादरीकरणानंतर टाळ्यांच्या गजरात नर्तिकांचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या शेवटी गुरु गौरी देशपांडे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच सर्व नर्तिका आणि त्यांच्या पालकांचे अभिनंदन करून या अविस्मरणीय क्षणाचे स्मरणरंजन करण्यात आले. हा अरंगेत्रम सोहळा कलांजली नृत्य अकॅडमीसाठी आणि संबंधित कुटुंबियांसाठी अभिमानाचा तसेच भावनिक आनंदाचा सोहळा ठरला.

> “ “वेदिका, अनन्या, नित्या आणि जुही या चौघींचा आजचा अरंगेत्रम हा केवळ त्यांच्या नृत्यप्रवासाचा टप्पा नाही, तर त्यांच्या समर्पण, संयम आणि कलेवरील प्रेमाचे सुंदर फळ आहे. गुरु म्हणून मला अत्यंत अभिमान वाटतो की या विद्यार्थिनींनी परंपरेचा सन्मान राखत आधुनिकतेशीही नाजूक संतुलन साधले आहे. त्यांच्या प्रत्येक हालचालीत साधनेची झलक आणि आत्मभाव दिसतो — हाच खरा कलाकाराचा विजय आहे.
>
> **–गौरी देशपांडे,** प्रशिक्षक.


LAHU BALWADKAR Social Welfare
लहू बालवडकर सोशल वेलफेअर आयोजित
द्वादश मल्हार दर्शन
भारतातील १२ मार्तंड- मल्हार मंदिरातील कुलदेव श्री खंडोबा
यांच्या दर्शनाचा अभूतपूर्व सोहळा
भारतातील १२ संत, महंत व शक्तिपीठांच्या
चैतन्यस्पर्श
पादुकादर्शनाचा अभूतपुर्व सोहळा
वर्ष ५ वे
(जेजुरी, पुणे)
(पाल, सातारा)
(ता.कागवाड, जि. बेळगांव)
(देवरगुड्डा, कर्नाटक)
(मैलारा, कर्नाटक)
(मैलारपूर, कर्नाटक)
(बीदर, कर्नाटक)
(माळेगांव, जि. नांदेड)
(अणदूर, धाराशिव)
(सातारा, छत्रपती संभाजी नगर)
(शेगुड, अहिल्यानगर)
(निमगाव, खेड)
रविवार दि. १६ नोव्हेंबर २०२५
स्थळ : बालेवाडी हायस्ट्रीट मैदान, बालेवाडी, पुणे.
महाआरती : दुपारी १२.३० व सायंकाळी ७.०० वाजता.
दर्शन व महाप्रसाद : वेळ - सकाळी १० ते रात्री ८ वाजेपर्यंत.
लहू गजानन बालवडकर
अध्यक्ष : कोथरूड विधानसभा (उत्तर मंडल)
Lahubalwadkar lahubalwadkarofficial LBalwadkar